यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे येथे आयोजित केलेल्या कार्यशाळेचे रु. २,३०,१९५/- चे प्रलंबित देयक अदा करण्यास कार्योत्तर मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः जेएलएम ०८१७/ प्र.क्र. ९८/ तुरुंग-२
दुसरा मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २९ जानेवारी, २०१८.

वाचा :

अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, पुणे यांचा प्रस्ताव न्यावि/मृ.बं./संकीर्ण/ २०१६/कक्ष-९(९), दिनांक १५.९.२०१७

शासन निर्णय :

मा.अध्यक्ष, राज्य मानवी हक्क आयोग मुंबई यांचे निर्देशानुसार तुरुंगातील कैद्यांचे मानवाधिकार रक्षण व तुरुंगातील कैद्यांच्या मृत्यूबाबत अवलंबावयाची मार्गदर्शक तत्वे याबाबत राज्यातील उपविभागीय दंडाधिकारी, कारागृहातील अधीक्षक व कारागृह वैद्यकीय अधिकारी यांचेकरीता जागृती कार्यशाळेचे आयोजन यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी,पुणे येथे दिनांक २२.६.१७ व दि.२३.६.२०१७ या कालावधीमध्ये करण्यात आले होते. सदर कार्यशाळेचे रु.२,३०,११५/- चे देयक अदा करण्यास प्रशासकीय विभागाच्या मान्यतेची आवश्यकता असल्याने सदर देयक अदा करण्यास या शासन निर्णयान्वये कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

२. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे यांना अदा करावयाच्या देयकाबाबतचे विवरणपत्रक खालीलप्रमाणे आहे-

अ. क्र.	तपशील	रक्कम
१	निवासाचा खर्च	१,०३,३००/-
२	जेवण, चहापानाचा खर्च	७०,८००/-
३	क्लासरुम चार्जेस	२६,०००/-
	एकूण	२,००,०००/-
	सर्व्हीस टॅक्स	३०,०१५/-
	एकूण बील	२,३०,११५/-

(अक्षरी रुपये दोन लाख तीस हजार एकशे पंधरा फक्त)

३. या प्रकरणी होणारा खर्च मागणी क्रमांक " बी-५, मुख्य लेखाशीर्ष -२०५६ तुरुंग (००१) संचालन व प्रशासन,(००)(०१) कारागृह निरीक्षणालय (२०५६००२६) १३ कार्यालयीन खर्च " या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दि.१७ एप्रिल २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग-दोन अ.क्र.१०, नियमक्र.३१ (अ)(एक) अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार, त्यातील विहित अटी व शर्तीच्या अधीन राहुन, निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०१२९१२२२४५५७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Saguna G Thengil

Digitally signed by Saguna G Thengil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d46fe3bd37ed57f0bdb52fb3a029adc135025943cb93cc90de6ceb564ced5ea3, cn=Saguna G Thengil
Date: 2018.01.29 14:49:18 +05'30'

(सगुणा ठेंगिल)
कक्ष अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. विशेष पोलीस महानिरीक्षक (मुख्यालय) , महाराष्ट्र राज्य, पुणे,
३. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य, नागपूर,
५. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
६. संचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे ७.
७. अध्यक्ष, राज्य मानवी हक्क आयोग,हजारीमल सोमाणी मार्ग, मुंबई
८. कार्यासन अधिकारी, बीयुडी-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
९. कार्यासन अधिकारी, (व्यय-८/विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१०. निवड नस्ती (तुरुंग-२).